# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि तंत्र विद्यालय, मुल-मारोडा, ता. मुल, जि.-चंद्रपूर

**श्री. के. डी. दडमल**
**प्राचार्य**

**इमेल - atsmulmaroda@gmail.com**


जा. क्र. प्राचार्य/ कृतवि/ पशुधन विभाग/300/२०२५ दिनांक:-28/३/२०२५

प्रति,

मा.कार्यालय प्रमुख,
कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

विषय:- कृषि तंत्र विद्यालय, मुल-मारोडा येथील बैलाच्या लिलावाचे सुचनापत्र प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कृषि तंत्र विद्यालय, मुल-मारोडा (सोमनाथ) येथील बैलाच्या लिलाव दिनांक १५/४/२०२५ ला आयोजीत केलेला आहे व त्याचे सुचनापत्र व लिलावाचे नियम व अटी आपल्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.

प्राचार्य
कृषी तंत्र विद्यालय
मुल-मारोडा (सोमनाथ)
ता. मूल जि. चंद्रपूर-४४१२२४

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला

## कृषि तंत्र विद्यालय मुल-मारोडा बैल व गोरे यांच्या लिलावाच्या नियम व अटि

दिनांक १५/४/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता कृषि तत्र विद्यालय मुल -मारोडा, येथे जनावरांचा जाहीर लिलाव करण्यात येत आहे.

जनावरांचे लिलावा करीता नियुक्त अधिकारी जनावरांचा लिलाव करतील लिलाव सुरु करण्यापुर्वी जनावरांची पुर्ण माहिती जाहीर करतील व लिलावाच्या अटी समजून सांगतील.

१. लिलावात बोली बोलणा-यास सुरुवातीला रु १०००/- (एक हजार रुपये फक्त) अनामत रक्कम म्हणून जमा करावी लागेल कोणत्याही व्यक्तीस अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावामध्ये बोली बोलण्यास परवानगी देण्यात येणार नाही. सर्वाची बोली पुर्ण झाल्यानंतर त्यांनी जनावरे घेण्यास नकार दिल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदर लिलाव शेतक-यांच्या हितार्थ असल्याने शेतक-यांचा शेत जमिनीचा ७/१२ व आधार कार्ड दाखला सोबत आणणे आवश्यक राहील.

२. लिलावात जनावरे घेणा-यांची अनामत रक्कम सर्वाची बोली झाल्यानंतर बोली धारकाने जनावरांची सपुर्ण रक्कम भरल्यानंतर परत करण्यात येईल. त्याचप्रमाणे अयशस्वी बोली बोलण-यांची अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येईल.

३. बोली बोलताना बोलीची रक्कम कमीत कमी रु १००/- रुपयानी वाढवावी लागेल. लिलावाची तिसरी फेरी पुर्ण झाल्यावर सर्वात जास्त बोली बोलणा-यांचे नाव जाहीर करुन लिलावाची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल.

४. ज्या व्यक्तीस बोली मंजूर झाली त्या व्यक्तीस मंजूर झालेल्या बोलीच्या किंमती एवढी पूर्ण रक्कम त्वरीत अदा करावी लागेल लिलावात खरेदी केलेल्या जनावराची पूर्ण किंमत भरुन संबंधित बोली धारकांच्या सदर जनावरे ताबडतोब स्वत:च्या ताब्यात घ्यावी लागेल व स्वखर्चाने न्यावे लागेल सदर जनावरांची कोणतीही जबाबदारी विभागाच्या लिलाव समितीची राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी मंजूर बोलीधारकाची राहिल, बोली धारकाने खरेदी केलेली जनावरे ताबडतोब ताब्यात

न घेतल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत जनावरांच्या समिती मार्फत पुन्हा लिलाव करण्यात येईल.

५. लिलावतील जास्तीत जास्त बोली स्वीकृत करणे अथवा न करणे तसेच अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबंधीत जनावरे देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीचा राहील त्याशिवाय लिलावात इतर बाबतीत लिलाव समिती अधिका-याचा निर्णय अखेरचा व बंधनकारक राहिल.

६. एकदा लिलावात विकत घेतलेले जनावरे कोणत्याही सबबीखाली परत घेतल्या जाणार नाही संबंधीत बोली धारकाने जनावरांचा ताबा न घेतल्यास अनामत रक्कम जप्त करुन विद्यापीठात जमा करण्यात येईल.

७. जनावरांचा लिलाव प्रत्येकांच्या बाबतीत वेगवेगळा अथवा गटागटाने करणे हे लिलाव समितीच्या मर्जीवर अवलंबून राहील.

८. लिलाव पुर्ण करण्याचा निर्णय तसेच कोणतेही कारण न दाखवता लिलाव रदद/ स्थगीत करण्याचा अधिकार लिलाव समितीस राहील लिलाव समितीने दिलेल्या निर्णयावर कोणतीही अपील करता येणार नाही बोली धारकांना हा लिलाव अखेरचा व बंधनकारक राहील.

९. लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे. आरडाओरडा करणे किंवा दखल देणा-यास लिलावातून बाद करण्यात येईल व त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. लिलावात सर्वाच्या बोली बोलून जनावरे खरेदी केलेल्या बोली धारकास सदरहू जनावरे ताबण्यात घेतल्यास ती जनावरे शेती कामाकरीता पाळण्यकरीता विकत घेत असून कत्तली साठी वापरणार नाही असे लेखी हमी पत्र लिहून दयावे लागेल.

११. लिलावात विकत घेतलेले जनावरे बोली धारकाने २४.०० तासाच्या आत न नेल्यास २०० रु खावटी विभागात जमा करावी लागेल अन्यथा सदरहू बोली धारकाची रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. नाव नोंदणी व अनामत रक्कम भरण्याची वेळ सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत राहील.

१३. लिलावाचे स्थळ:- कृषि तंत्र विद्यालय, मुल-मारोडा (सोमनाथ) या विद्यालयाचे परिसर.

प्राचार्य
कृषी तंत्र विद्यालय
मुल-मारोडा (सोमनाथ)
ता. मूल जि. चंद्रपूर-४४१२२४